Golden Research Thoughts ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-10 | April-2015 Available online at www.aygrt.isrj.org

# चेतना गाला सिन्हा आणि माणदेशी महिला बँक



एस.एन.गायकवाड
श्रीमती सी . बी .शाह महिला महाविद्यालय ,सांगली .

**Authors Short Profile**

Gaikwad Sanjaykumar Namdev is working as an Associate Professor at Department of History in C. B. Shah Mahila Mahavidyalaya, Ratanshi Nagar,Sangli.He has completed B.A., M.A., Ph.D. He has teaching experience of 11 yeqars.He has done 2 minor research project on “The Work of Shetkari Kamgar Paksha in Solapur Dist (1980-2005)" and “History of Mandesh”.



प्रस्तावना :

इतिहास आणि इतर सामाजिक शास्त्रे यांचे नाते अतूट आहे. त्यामुळे राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशात्र, इत्यादी शास्त्रांना इतिहास लेखनात अनन्यसाधारण महत्व आहे. आर्थिक इतिहासाचा विचार करता अनेक व्यक्तींनी योगदान दिल्याचे दिसते. या क्षेत्रात महिलाही मागे नव्हत्या. अनेक महिलांनी पुरुषांच्या खांदयाला खांदा लावून काम केलेले आहे. माणदेशातील महिलाही त्याबाबतीत मागे नव्हत्या. त्यापैकीच एक म्हणजे श्रीमती चेतना सिन्हा गाला या होय. त्यांनी माणदेशी महिला बँकेच्या माध्यमातून गरजू महिलांना सहाय्य केले. दुष्काळी भागात चारा छावण्या सुरु केल्या व पाझर तलाव तयार करून पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीच्या पाण्याच्या प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला.

**प्रस्तावना**

## जन्म ,बालपण व शिक्षण :

श्रीमती चेतना गाला सिन्हा या मुळच्या मुंबईतील आहेत. त्यांचे वडील मगनलाल खिमजी गाला यांचे नळबाजार – भेंडीबाजार भागात एक दुकान होते. कुमकुमबेन आणि मगनलाल यांच्याकुटुंबात २१मार्च १९५८ रोजी यांचा जन्म झाला[१]. कुमकुमबेन आणि मगनलाल यांचे हे तिसरे कन्यारत्न होते. चेतना यांचेवर कोणत्याही स्वरुपाची परंपरागत बंधने नव्हती. चेतना यांनी त्यांचे शिक्षण इंग्रजी माध्ममाच्या मास्टर्स हायस्कूल मध्ये पूर्ण केले[२]. १९७५च्या दरम्यान मुंबईच्या लाला लजपतराय वाणिज्य महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला. श्रीमती इंदिरा गांधी यांनी १९७५ ते १९७७ या काळात आणीबाणी लादली होती[३].

## आणीबाणी आणि चेतना सिन्हा :

आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधी यांच्याविरोधात सुरु झालेल्या चळवळीचे नेतृत्व जयप्रकाश नारायण यांचेकडे होते. त्यांच्या नेतृत्वाने प्रभावित होऊन लक्षावधी युवक रस्त्यावर उतरले. चेतना सिन्हा ही त्यापैकी एक होत्या. आणीबाणीविरोधी आंदोलनातून संघटना बांधल्या गेल्या ग्रामीण भागात काम करण्यासाठी या गटाने पुढाकार घेण्यास सुरवात केली. येथेच माणदेशी महिला बँकेच्या स्थापनेचे बीज निर्माण झाले.

## माणदेशी महिला बँकेची स्थापना :

देश बदलायचा तर ग्रामीण भागात काम उभे केले पाहिजे या जिद्दीतून चेतना गाला यांचे लक्ष ग्रामीण भागाकडे वेधले गेले. इलाबेन भट्ट सेवा संस्थेच्या संस्थापिका याचबरोबर सातार्‍याचे तत्कालीन जिल्हा निबंधक दिनेश ओउळकर यांच्या सहकार्याने श्रीमती चेतना गाला सिन्हा यांनी १९९७ मध्ये माणदेशी महिला बँकेची स्थापना केली. माणदेशातील म्हसवडसारख्या भागात महिला बँक सुरु करण्यासाठी त्यावेळी ६ लाख रुपये भागभांडवलाची आवश्यक्यता होती. त्यासाठी शेअर्स गोळा करताना सुरवातीस अनेक अडचणी आल्या. कारण या भागात आतापर्यंत अनेकांनी शेअर्स गोळा केले होते. परंतु संस्था स्थापन झालेल्या नव्हत्या अशा स्थितीतही चेतना सिन्हानी निराश न होता जिद्दीने शेअर्स गोळा करून सहकार खात्याकडे प्रस्ताव पाठवून दिला[४].

सदरचा प्रस्ताव रिझर्व बँकेत आल्यानंतर बँकेच्या प्रमोटिंग सदस्यांच्या विस्तृत माहितीवरून संबंधीत सदस्य हे अशिक्षित होते हे निदर्शनास आले. प्रमोटिंग सदस्य अशिक्षित असल्याने लायसन्स देता येणार नाही अशी सबब सांगून प्रस्ताव फेटाळून लावण्यात आला. त्यामुळे चेतना सिन्हा व त्यांच्या सहकार्यांची तीन वर्षाची मेहनत वाया गेली. परंतु या कालावधीत आलेल्या अनुभवामुळे त्यांचात मोठा आत्मविश्वास निर्माण झाला होता. निरक्षरतेमुळे बँकेचा प्रस्ताव फेटाळला गेला याचे अतीव दु;ख या

महिलांना झाले परिणामी त्यांच्यातील जिद्द व स्वत:ला सिध्द करण्याची मानसिकता या गुणांमुळे या महिला साक्षर झाल्या. त्यांना लिहिता वाचता येवू लागले. आपली सही त्या स्वत: करू लागल्या. त्यांनी पुन्हा एकदा नव्याने प्रस्ताव तयार करून सादर करण्यासाठी त्या १७ जणी मिळून रिझर्व बँकेकडे गेल्या. परत तोच प्रस्ताव आल्याचे पाहून वरीष्ठांनी त्यांना बाहेरच्या बाहेर टाळण्याचा प्रयत्न केला[५]. परत अतंत्य संयमाने व चिकाटीने त्यांनी आपली भूमिका मंडली. त्यामुळे या महिला जिद्दीने साक्षर झाल्याचे प्रत्यंतर आले. परिणामस्वरूप ९ ऑगस्ट १९९७ रोजी माणदेशी महिला बँकेला रिझर्व बँकेकडून लायसन मिळाले. आज या बँकेचे १,६५,००० खातेदार आहेत.

## घरपोच सेवा :

या भागातील महिला आपल्या रोजच्या कमाईतून काही वाटा बाजूला काढू शकत होत्या. पण रोजच्या रोज बँकेत भरणा करणे त्यांना शक्य होत नव्हते ही वस्तुस्थिती होती. त्यामुळे त्यांच्या घरी किंवा सोयीच्या ठिकाणी जाऊन पैसे गोळा करणे व बँकेत आणून त्यांच्या खात्यात जमा करणे हा मार्ग समोर आला. डेली बँकिंग, डोअरस्टेप बँकिंग म्हणजेच घरपोच सेवाच्या संकल्पना त्यातून समोर येत गेल्या. ही नावे मोठी वाटली तरी त्यांच्या बचतीचे आकडे खूप छोटे छोटे होते. ही रक्कम जमवण्यासाठी श्रीमती चेतना गाला सिन्हा यांनी महिला प्रतिनिधीची नियुक्ती केली[६]. यातूनच बचतीची सुरवात झाली. त्यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत झाली.

## बँकेच्या माध्यमातून रचनात्मक कामे :

बँकेच्या माध्यमातून काही रचनात्मक काम उभे राहिले पाहिजे अशी भावना श्रीमती चेतना सिन्हा यांची असल्याने त्यांनी महिलांना आत्मविश्वास देणे, त्यांना मालकी हक्काची जाणीव देणे, त्यांच्या गरजेच्या वेळी पाठीशी उभे राहणे या भूमिका त्यांनी पार पाडल्या. परिणामी हळूहळू बँकेच्या कामाला वेग येऊ लागला. पहिल्या वर्षी ६,००,००० शेअर्स आणि ६६,००,००० अनामत जमा झाले. नियमाप्रमाणे भागभांडवल व अनामतवर ७५ टक्के कर्जवाटपही झाले. पहिले वर्ष सुरळीतपणे पार पडल्यावर सर्वांचाच आत्मविश्वास वाढला. ग्रामीण भागातही महिलांना बचतीसाठी प्रोत्सहित करायचे असेल तर त्यांच्यातील उद्योजगतेला चालना दिली पाहिजे असे चेतना सिन्हा यांचे मत होते. त्यामुळे त्यातूनच वेगवेगळ्या संकल्पना जन्म घेऊ लागल्या. महिलांना कर्ज देताना तो पैसा अंतिमता महिलांच्या नियंत्रणात राहिला पाहिजे या दृष्टीने त्यांनी दूरगामी निर्णय घेतले. उदा –कोंबड्यांसाठी कर्ज दिले, मात्र पोल्ट्रीसाठी नाही, गाई-म्हशीसाठी कर्ज दिले, पण डेअरी सुरु करण्यासाठी नाही इत्यादी.

भाजीपाला विकणाऱ्या महिलांसाठी विविध योजना आखल्या त्यापैकी एक छत्रीसाठी बिनव्यजी कर्जाची योजना, उन्हापावसात राबणाऱ्या या महिलांना दिलासा मिळावा म्हणून ही योजना अंमलात आणली. सर्व साहित्य झाकले जाईल अशा आकाराच्या छत्र्या महिलांनी बँकेतर्फे खरेदी केल्या आणि बिनव्याजी कर्जाच्या योजेनेत वितरित केल्या. मुलींना सायकल खरेदीसाठी बँकेने बिनव्याजी कर्ज देण्यास

सुरवात केली. त्यामुळे मुलींच्या शाळेची सोय तर झालीच पण मुलांप्रमाणे सायकलवरून फिरताना घरची कामे करताना त्यांचा आत्मविश्वासही लक्षणीयरीत्या वाढला. मान्सूनच्या लहरीपणामुळे सन २०११ - २०१२ मध्ये महाराष्ट्राला भयंकर दुष्काळी परिस्थितीला सामोरे जावे लागले. या कालखंडात जनावरांच्या चाऱ्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले. या समस्येवर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने लहान लहान बंधारे बांधण्याची योजना आखली. अशा बंधाऱ्यामध्ये पाण्याचा साठा केला जातो. त्यामुळे भूजल पतळी वाढते. या दुष्काळात चेतना सिन्हा यांच्या माणदेशी महिला बँकेने आजूबाजूच्या खेडयामध्ये चारा छावण्याचे काम हाती घेतले. त्या मार्फत गावातील सर्व गुरांना चाऱ्याचे वाटप करण्याचे काम त्यांनी अथकपणे केले. ज्या वेळी महाराष्ट्र शासनाच्या बंधारे बांधण्याच्या योजनेबद्दल चेतना सिन्हा यांना माहिती मिळाली. त्याच वेळी त्यांनी म्हसवड शहराच्या आजूबाजूच्या परिसरात तीन बंधारे बांधण्याची त्यांनी योजना शासनाला सादर केली.[७]त्यांच्या मार्गदर्शनाखालीच फुलकोटी, शिर्सव व म्हसवड या ठिकाणी बंधारे बांधण्याची योजना आखली गेली. हा सुमारे १,००,००.००० रुपयेचा आराखडा होता. राज्य सरकारने या योजनेसाठी निधी पुरवला. पण बँकेने स्वतः ही योजना अंमलात आणण्याचे ठरवले व अशा बंधाऱ्याचे बांधकाम केले. ही योजना २० पेक्षा अधिक गावांना लाभदायक ठरण्याची आशा आहे.

मे २०१३ मध्ये या बंधाऱ्याचे बांधकाम पूर्ण झाले. त्यानंतर जून – जुलै व ५ ऑक्टोंबर १९१३ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे हे बंधारे पूर्ण क्षमतेने भरले होते. परिणामी स्थानिक लोकांच्या पाण्याचा प्रश्न जवळ जवळ सुटला. माण तालुक्यात बांधले गेलेले हे बंधारे संपूर्ण सातारा जिल्हयासाठी दुष्काळी परिस्थतीत पाण्याच्या दुर्भिक्ष काळात अतिशय उपयोगी पडणारे आहेत. भविष्यकाळात अशा बंधाऱ्यामुळे पाणी प्रश्न सोडवणे शक्य होणार आहे. या बंधाऱ्यामुळे फक्त एका पातळीपर्यंत कमी जागेत पाणी साठवणे शक्य झाले आहे. मोठमोठया यंत्रसामग्रीच्या सहाय्याने जमिनित खोलवर खोदकाम करून मोठमोठी धरणे बांधण्याची गरज नाही हे या योजनेमुळे सिध्द झाले.[८] त्यामुळे अशा प्रकारच्या इतर अनेक योजनांना प्रोत्साहन देणे शासने सुरु केले. परिणामी जवळ जवळ १०,००० लोकांच्या गरजेकरता लागणारा पाणीसाठा उपलब्ध झाला आहे.

## सारांश

थोडक्यात अविरतपणे समाजकार्य करणाऱ्या चेतना सिन्हा यांनी माणदेशी महिला सहकारी बँकेच्या माध्यमातून अनेक गरजू महिलांना आधार देण्याचे काम केले. दुष्काळी भागात चार छावणीच्या माध्यमातून जनावरांना चाऱ्याचे वाटप करण्याचे काम त्यांनी अथकपणे केले. स्थानिक ग्रामस्थांच्या पाण्याच्या समस्येवर मात करण्यासाठी अविरतपणे प्रयत्न करून अनेक लहान लहान बंधारे बांधून लोकांच्या जीवनात हास्य फुलवले.

## संदर्भ :

१. चेतना गाला सिन्हा यांची दिनांक १० जानेवारी २०१३ ची मुलाखत.

२. कित्ता.
३. कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन नागपूर, २०१२ ,पृ.क्र.७०१.
४. दैनिक लोकसत्ता, दिनांक १९ जानेवारी २०१३, पृ .क्र. २.
५. कित्ता.
६. चेतना गाला सिन्हा यांची दिनांक १० जानेवारी २०१३ ची मुलाखत.
७. संडे टाईम्स, दि. ०६ ऑक्टोंबर २०१३, पृ. क्र. ०१.
८. संडे टाईम्स, दि. ०६ ऑक्टोंबर २०१३, पृ. कृ. ०५.